# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**मराठी भाषेत पीएच. डी. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना ''अनुभव'' न्युयॉर्क तर्फे दिल्या जाणाऱ्या संशोधन शिष्यवृत्तीबाबत**

या परिपत्रकाव्दारे सर्व संबधिताना कळविण्यात येते की, महाराष्ट्रातील मराठी भाषेत पीएच. डी. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना ''अनुभव'' न्युयॉर्क तर्फे मराठी नवकथेचे जनक गंगाधर गाडगीळ यांच्या नावे असलेली एक द्वैयवार्षिक शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी ''अनुभव'' या संस्थेकडून दि. १५/१०/२०१६ पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले असुन नियम व अटींची प्रत सोबत जोडत आहे. तरी पात्र विद्यार्थ्यांनी सदर संस्थेकडे विहित मुदतीत अर्ज सादर करावे.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/३५४८ )
दिनांक : १२/०९/२०१६ )

12/9/16.
सह. कुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत:

मा. विभागप्रमुख, मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

मा. प्राचार्य, संशोधन केंद्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागात/संशोधन केंद्रात पीएच. डी (मराठी) अभ्यासक्रमास नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

**ANUBHAV**

# Anubhav Trust

6325
10/9/2016

दि. ६ सप्टेंबर २०१६.

- 8 SEP 2016
5877
09/09/2016

BCUD

**मा. कुलगुरू**
सावित्रीबाई फुले,
पुणे विद्यापीठ

'अनुभव' न्यू यॉर्क तर्फे, महाराष्ट्रातील मराठी भाषेत संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना, मराठी नवकथेचे जनक गंगाधर गाडगीळ यांच्या नांवे असलेली एक द्वैवार्षिक शिष्यवृत्ती देण्याची घोषणा करण्यात आली आहे. तीन विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन लाख रुपये असे तिचे स्वरूप आहे. त्यासंदर्भातील माहिती या पत्रासोबत पाठवीत आहोत.

आपल्या विद्यापीठा अंतर्गत Ph. D. करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत ही माहिती पोचविण्यात यावी ही विनंती.

सहकार्याच्या अपेक्षेने
आपली विश्वासू

Director BCUD Office
Savitribai Phule Pune University
In.Dt. 09 SEP 2016
Inward 3995
Outward Date: 10/09/16

A.R.(P.G.)

Pl. inform to all Ph.D registered students

**(डॉ. संजीवनी तडेगावकर)**
**समन्वयक**

244, Madison Ave. New York NY - 10016 | Email: reach@anubhavtrust.org | Web: www.anubhavtrust.org

India Contact : Dr. Sanjiwani Tadegawkar, 4, Dnyaneshwari, Shivnagar, Old Jalna - 431213.
Cell: +91 9423457623, +91 9421494746, +91 7066103305 | Email: tadegawkarsanjiwani@yahoo.com



'अनुभव' न्यू यॉर्क तर्फे, महाराष्ट्रातील मराठी भाषेत संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना,मराठी नवकथेचे जनक गंगाधर गाडगीळ यांच्या नांवे असलेली एक द्वैवार्षिक शिष्यवृत्ती देण्यात येईल.

**शिष्यवृत्ती प्रत्येकी दोन लाख रुपयांची असेल. एका वेळेस पुढे नमूद केलेल्या विषयांपैकी कुठल्याही विषयात Ph. D. करणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येईल:काव्य, कथा, भाषाशास्त्र, कादंबरी, आणि विज्ञान कथात्म साहित्य.**

दर दोन वर्षातून दिल्या जाणाऱ्या या शिष्यवृत्तीसाठीचे विषय वरील पाच विषयातून आलटून पालटून ठरवले जातील. ही शिष्यवृत्ती, पूर्णतः खासगी असून, तिचा भारतातील कुठल्याही विद्यापीठाशी अथवा सरकारी यंत्रणेशी संबंध नाही. उमेदवारांच्या निवडीसाठी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विद्यापीठाच्या चारअभ्यासू प्राध्यापकांची एक निवड समिती प्रस्थापित करण्यात आली आहे. ही निवडसमिती दर दोन वर्षांनी तीन उमेदवारांची निवड करील.

या शिष्यवृत्तीच्या व्यवस्थापनेसाठी 'अनुभव' ने महाराष्ट्रात एक संपर्क केंद्र प्रस्थापित केले असून त्याचा पत्ता खालीलप्रमाणे आहे.

**'अनुभव'**

**द्वारा डॉ. संजीवनी तडेगावकर,**

**'ज्ञानेश्वरी', शिव नगर,**

**जुना जालना,**

**जालना -४३१-११४**

**दूरभाष: ९४२३४५७६२३, ९४२१४९४७४६,७०६६१०३३०५**

**ई-मेल:** tadegawkarsanjiwani@yahoo.com

मात्र शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज इच्छुकांना **www.anubhavtrust.org**या वेब-साईट वरूनच डाऊनलोड करावे लागतील. भरलेले अर्ज उमेदवारांनी वरील पत्त्यावर डॉ. संजीवनी तडेगावकर यांना पाठवावेत. अर्जासोबत सर्व प्रमाणपत्रांच्या फोटोकॉपीज, तसेच आधार कार्ड ची फोटोकॉपी जोडणे आवश्यक आहे. या कागदपत्रांशिवाय अर्ज वैध मानला जाणार नाही. भरलेले अर्ज वरील पत्त्यावर पोचण्याची अंतिम तारीख १५ऑक्टोबर २०१६ आहे.अंतिम तारखेनंतर पोचलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

## 'अनुभव'च्या गंगाधर गाडगीळ मराठी संशोधन शिष्यवृत्ती अर्जासाठी योग्यतेच्या अटी

1. या शिष्यवृत्तीसाठी धर्म, जात, लिंग इत्यादीचे बंधन नाही.
2. ही शिष्यवृत्ती यु. जी. सी. अंतर्गत महाराष्ट्रातील कुठल्याही विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.**काव्य, कथा, भाषाशास्त्र, कादंबरी, आणि विज्ञान कथात्म साहित्य** या विषयांशी संबंधित Ph. D. करणाऱ्या उमेदवारालाच ही शिष्यवृत्ती देण्यात येईल.
3. अर्ज करते वेळी उमेदवाराचे वय ३५ वर्षांहून अधिक नसावे.
4. उमेदवार कुठल्याही कायम नोकरीत नसावा.
5. अर्ज करतेवेळी उमेदवाराला इतर कुठलीही शिष्यवृत्ती (सरकारी अथवा खाजगी) प्रदान झालेली नसावी. तसेच या शिष्यवृत्तीसाठी निवड झाल्यास, उमेदवार त्यानंतर ३ वर्षांच्या काळात इतर कुठलीही शिष्यवृत्ती स्वीकारू शकणार नाही.
6. अर्ज करतेवेळी उमेदवाराचे Ph. D. रजिस्ट्रेशन झाले असेल तरच उमेदवार या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरेल.
7. शिष्यवृत्ती मिळाल्यापासून तीन वर्षाच्या आत विद्यार्थ्याने विद्यापीठास प्रबंध सदर करणे बंधनकारक राहील.
8. उमेदवाराला कॉम्प्युटर चे किमान ज्ञान (ई-मेल पाठवणे इ.) असणे आवश्यक आहे.
9. उमेदवाराला प्रत्यक्ष मुलाखालीसाठी एकदा निवडसमिती समोर स्वतःच्या खर्चाने हजर व्हावे लागेल. त्यावेळी प्रत्येक उमेदवाराला एक Psychometric Test (व्यक्तीमत्वविषयक लेखी चांचणी) द्यावी लागेल. या चाचणीचा कालावधी ३० मिनिटे असेल.
10. निवडसमितीचा निर्णय अंतिम असेल.